MHNS180007902020

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | २८.०८.२०२०. |
| नोंदणी तारीख | : | २८.०८.२०२०. |
| निकाल तारीख | : | ०७.०४.२०२६. |
| कालावधी | : | वर्षे महिने दिवस |
| | | ०५ ११ १० |
| निशाणी | | **७१** |

**कळवण येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालयात**

**ता. कळवण, जिल्हा– नाशिक.**

(पिठासन अधिकारी – व्ही.बी.चव्हाण)

**नियमीत फौजदारी खटला क्रं. ७८/२०२०.**

गुन्हा नोंद क्र. ४६/२०२०

**फिर्यादी/तक्रारदार** **महाराष्ट्र शासन तर्फे**
**पोलीस निरीक्षक,**
कळवण पोलीस स्टेशन,
ता. कळवण, जि. नाशिक

**अभियोग पक्षातर्फे** सहाय्यक सरकारी अभियोक्ता
श्री. ए.बी.शेख.

**आरोपी**

१. **बाळु देवबा बच्छाव,** वय ६१ वर्षे,
२. **दिनेश बाळु बच्छाव,** वय ३५ वर्षे,
३. **नागेश बाळु बच्छाव,** वय ३२ वर्षे,
४. **सुरेखा बाळु बच्छाव,** वय ५६ वर्षे,
५. **चित्रा दिनेश बच्छाव,** वय ३० वर्षे,
६. **सोनाली नागेश बच्छाव,** वय २७ वर्षे,

सर्व रा. नवी बेज, ता. कळवण, जि. नाशिक.

**आरोपींतर्फे विधीज्ञ** श्री.डी.वाय.पाटील,

## भाग – ब

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | २५.०६.२०२०. |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | २७.०६.२०२०. |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | २१.०८.२०२० |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | :– | १६.०९.२०२३. |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | १०.०३.२०२६. |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | ०७.०४.२०२६. |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | ०७.०४.२०२६. |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | ---- |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्या बाबत कलावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बाळु देवबा बच्छाव | ०८.०७.२०२० | ०९.०७.२०२० | भादवी कलम १४८, ३२६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ | निर्दोष मुक्त | नाही | नाही |
| २. | दिनेश बाळु बच्छाव | ०९.०७.२०२० | ०९.०७.२०२० | | | नाही | नाही |
| ३. | नागेश बाळु बच्छाव | ०८.०७.२०२० | ०९.०७.२०२० | | | नाही | नाही |
| ४. | सुरेखा बाळु बच्छाव | ०९.०७.२०२० | ०९.०७.२०२० | | | नाही | नाही |
| ५. | चित्रा दिनेश बच्छाव | ०९.०७.२०२० | ०९.०७.२०२० | | | नाही | नाही |
| ६. | सोनाली नागेश बच्छाव | ०९.०७.२०२० | ०९.०७.२०२० | | | नाही | नाही |

## भाग – क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्ष –**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | एकनाथ नामदेव बच्छाव | फिर्यादी | ६३ |
| २ | विमलबाई एकनाथ बच्छाव | साक्षीदार | ६५ |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | निशाणी ६४/अभियोग साक्षीदार क्र. १ | फिर्यादीची फिर्यादीवरील सही |

**ड. आरोपीमार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | घटनास्थळ पंचनामा | ६६ |
| २. | वैद्यकिय प्रमाणपत्र | ६७ |
| ३. | वैद्यकिय प्रमाणपत्र | ६८ |
| ४. | वैद्यकिय प्रमाणपत्र | ६९ |

## न्यायनिर्णय

**(घोषणा तारीख– ०७ एप्रिल २०२६.)**

प्रस्तूतचा खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४८, ३२६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ या अपराधासाठी चालविण्यात आला.

२. **अभियोगपक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.**

दि. २५.०६.२०२० रोजी सायंकाळी ६.३० वाजेचया सुमारास फिर्यादी एकनाथ, त्यांची पत्नी विमलबाई व मुलगा नरेंद्र असे त्यांच्या बैलांना खळवाडीत चारापाणी

घालण्यासाठी गेले. त्यावेळी तेथे सर्व आरोपी बाळु, दिनेश, नागेश, सुरेखा, चित्रा, सोनाली असे खळवाडीचे जागेत कोयत्याने वडाग येथुन पहार, फावडे, टिकावाने तारकंपाउंडसाठी खड्डे करत होते. ते पाहुन फिर्यादी व इतरांनी ते पाहुन सर्वांना समजावुन सांगत होते की, 'तुम्ही आमचे खळवाडीचे जागेत तारकंपाउंडसाठी खड्डे का करतात, तुमच्या जागेत खड्डे करा' अशा सांगण्याचा त्यांना राग येवुन त्यांनी सर्वांनी एकत्र जमुन फिर्यादी व साक्षीदारांना वाईट शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण करु लागले. त्यावेळी आरोपी बाळुने फिर्यादीला धरुन ठेवुन आरोपी नागेशने हातातील लाकडी काठीने मारहाण केली. फिर्यादीचा मुलगा नरेंद्र व पत्नी विमलबाई अशांना त्याचे हातातील कोयता, कुऱ्हाड, मुदडाने, लाकडी काठीने, लाथाबुक्क्यांनी व हाताचापटीने मारहाण करुन तुमचा कशाचा वाटा, तुम्हाला मारुन टाकु अशी धमकी देत होते. ते पाहुन फिर्यादी, मुलगा नरेंद्र व पत्नी विमलबाईजवळ गेले. त्यावेळी विमलबाईला सर्वांनी हिसकबोचक करुन तिच्या डोक्याचे केस ओढातान करुन मारहाण करित असतांना प्रकाश बच्छाव, भाउसाहेब बच्छाव, दादा देशमुख अशांनी त्यांची भांडणाची सोडवासोडव केली. सदर भांडणामध्ये फिर्यादीला डोक्याला, पाठीला, उजवे पायाला, डावे हाताला कोपरावर मार लागुन दुखापत झाली आहे व मुलगा नरेंद्र यास आरोपी दिनेशने हातातील कोयत्याने नाकावर व बाळु याने हातातील लाकडी काठीने तसेच आरोपी नागेशने त्याचे हातातील कुऱ्हाडीचे मुदडयाने गंभीर मारहाण केली. फिर्यादी व साक्षीदार जखमी झाल्याने त्यांना भांडण सोडविण्यास आलेल्या लोकांनी लगेच कळवण पोलिसस्टेशनला घेवुन आले. त्यावेळी त्यांना भांडणात मार लागल्याने पोलिसांनी औषधोपचारासाठी मेडिकल यादी दिल्याने त्यांना सरकारी दवाखान्यात औषधोपचारासाठी दाखल केले. फिर्यादीचा मुलगा नरेंद्रची तब्येत गंभीर असल्याने त्याला अधिक उपचारासाठी सिविल हॉस्पीटल, नाशिक येथे दाखल केले. त्यानंतर फिर्यादीने त्यांच्याविरुध्द कळवण पोलिसस्टेशनला फिर्याद दिली.

३. सदरची फिर्याद गुन्हा रजिस्टर नंबर ४६/२०२०, भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३, १४६, १४७, १४८, ३२६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वये नोंदविण्यात आला. गुन्हयाचा तपास पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. माझे पुर्वपिठासीन अधिकारी यांनी प्रकरणात आरोपींविरुध्द

(निशाणी ३८) भा.द.वि कलम १४८, ३२६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वये दोषारोप नोंदविला. आरोपींनी गुन्हा कबुल नसल्याचे निवेदन देऊन सुनावणीला सामोरे जाण्याची तयारी दर्शवली. अभियोग पक्षाचा पुरावा बंद केला. आरोपींविरुध्द पुरावा न आल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

४. अभिलेख, पुरावे पाहता, सदर प्रकरणात निकालासाठी खालील मुद्दे निघतात, ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय, आरोपींनी समान हेतुने फिर्यादी व साक्षीदारांना मारहाण करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव करुन हातात काठया, कोयता व कुऱ्हाड बाळगले ? | .. **नकारार्थी.** |
| २. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय, आरोपींनी समान हेतुने बेकायदेशीर जमाव करुन आरोपी क्र.२ ने फिर्यादीला व आरोपी क्र.३ ने साक्षीदार नरेंद्रला काठीने व विमलबाई यांना कुऱ्हाडीने मारहाण करुन इच्छापुर्वक गंभीर दुखापत केली ? | .. **नकारार्थी.** |
| ३. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय, आरोपींनी समान हेतुने बेकायदेशीर जमाव जमवुन फिर्यादी व साक्षीदारांना हाताचापटीने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन साधी दुखापत केली ? | .. **नकारार्थी.** |
| ४. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय, आरोपींनी समान हेतुने बेकायदेशीर जमाव करुन फिर्यादी व साक्षीदारांना अश्लील शिवीगाळ करुन प्रक्षोभीत केले ? | .. **नकारार्थी.** |
| ५. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय, आरोपींनी समान हेतुने बेकायदेशीर जमाव करुन फिर्यादी व साक्षीदारांना तुमचा कशाचा वाटा, तुम्हाला मारुन टाकु अशी धमकी दिली ? | .. **नकारार्थी.** |
| ६. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>कारणे</u>

५. आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. डी.वाय पाटील यांनी अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द संशयापलीकडे गुन्हा शाबीत केला नाही असा युक्तीवाद करुन आरोपींना निर्दोष मुक्त करण्याची विंनती केली आहे.

### <u>मुद्दा क्रमांक १ ते ६ करिता –</u>

६. सर्व मुद्दे हे परस्पर संलग्न असल्यामुळे त्याचे विवेचन एकत्रीत केलेले आहे. सदर प्रकरणात फिर्यादीमधील मजकूर शाबीत करण्यासाठी अभियोगपक्षाने फिर्यादी एकनाथ नामदेव बच्छाव (सा.क्र.१) व विमलबाई एकनाथ बच्छाव (सा.क्र.२) यांची साक्ष नोंदवली आहे.

७. फिर्यादी एकनाथ बाळु बच्छाव (साक्षीदार क्र.१, निशाणी ६३) यांचे पुराव्यात असे आले आहे की, फिर्यादी व त्यांनी पत्नी एकत्र राहण्यास असुन त्यांचा मुलगा मयत आहे. घटना साधारणतः ५ ते ६ वर्षापुर्वी घडली असुन त्यांना घटनाची वेळ लक्षात नाही व त्यांच्या खळयाचा गट नंबर सांगता येत नसल्याचे कथन केले आहे. तसेच घटना काहीही घडली नसुन त्यांचे आरोपीसोबत काहीही झालेले नव्हते व पोलिसस्टेशनला ते कशासाठी गेले होते हे त्यांच्या लक्षात नसल्याचे कथन केले आहे. त्याचप्रमाणे त्यांनी फिर्यादमधील मजकुर सांगितलेला नसुन त्यावर फक्त सही केली असल्याचे कथन केले आहे. विमलबाई एकनाथ बच्छाव (साक्षीदार क्र.२, निशाणी ६५) यांचे पुराव्यात असे आले आहे की, त्या व त्यांचे पती एकत्र राहण्यास असुन त्यांचा मुलगा मयत झाला आहे, आरोपी त्यांचे नातेवाईक आहेत ही बाब मान्य केली आहे. तसेच घटना किती वर्षापुर्वी किती वाजता घडली होती हे त्यांना सांगता येत नसल्याचे सांगुन घटना काय घडली हे त्यांना आठवत नसल्याचे कथन केले आहे.

८. फिर्यादी व साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य केले नसल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्यातर्फे त्यांचा उलटतपास घेण्यात आला. परंतु त्यांनी उलटतपासात संपुर्ण घटना स्पष्टपणे नाकारली आहे. फिर्यादीने फिर्यादमधील अधोरेखांकित भाग अ व साक्षीदाराने त्यांच्या जबाबातील अधोरेखंकित भाग अ सांगितला नव्हता. परंतु तो त्यांच्या

फिर्यादमध्ये व जबाबामध्ये का नमुद आहे याचे कारण ते सांगु शकत नसल्याचे कथन केले आहे. तसेच त्यांची व आरोपींची न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे सांगितले आहे. त्यामुळे आरोपींविरुध्द कुठलाही पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

९. फिर्यादी व साक्षीदारांच्या पुराव्यावरुन आरोपींनी बेकायदेशीर जमाव जमवुन हातातील काठया, कुऱ्हाड व कोयता बाळगुन फिर्यादी, मुलगा नरेंद्र व पत्नी विमलबाई अशांना काठया, कुऱ्हाड व कोयत्याने मारहाण करुन गंभीर जखमी केले, तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण व शिवीगाळ करुन, तुमचा कशाचा वाटा तुम्हाला मारुन टाकु अशी धमकी दिली हे तथ्य संशयापलीकडे सिद्ध होत नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ५ चे उत्तर नकारार्थी नोंदविला असून मुद्दा क्र. ६ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

**: <u>आदेश</u> :**

१. आरोपींची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४८, ३२६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ खाली शिक्षापात्र असलेल्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन मुचलके रद्द करण्यात येतात.

३. आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३७–अ प्रत्येकी रक्कम रु. १५,०००/– च्या जामीनावर सोडण्यात येते. अपील कालावधीनंतर आरोपींचा जामीन हा आपोआप रद्य होईल.

४. जप्त मुद्देमाल कुऱ्हाड, कोयता, लाकडी काठी व बांगडयांचे काचेचे तुकडे हे मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

VISHWAJIT BIPINCHANDRA CHAVAN

Digitally signed by VISHWAJIT BIPINCHANDRA CHAVAN
Date: 2026.04.07 17:17:10 +0530

दिनांक– ०७.०४.२०२६.

**(व्ही.बी.चव्हाण)**

सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कळवण.